# शेतमजूरांचे किमान वेतन

बा. न. राजहंस

शेतमजूराच्या किमान वेतनाचा प्रश्न हा दिवसेंदिवस अधिक गंभीर स्वरूप धारण करू लागला आहे. भारतातील शेतमजूर हे श्रमिक वर्गापैकी सर्वात शोषित व दरिद्री आहेत. ते संघटित नसल्याने त्यांचे हे शोषण अधिकच तीव्र स्वरूप धारण करीत आहे. शासनाने गेल्या काही वर्षांत शेतमजूरांना किमान वेतन मिळावे या दृष्टीने निरनिराळ्या राज्यात उपाययोजना केल्या आहेत पण या उपाययोजना अत्यंत तुटपुंज्या व कामचलाऊ स्वरूपाच्या आहेत. किमान वेतन ठरवताना कोणतेही शास्त्रीय निकष लक्षात घेतलेले दिसत नाहीत. म्हणून या प्रश्नाचा अधिक सखोल विचार करून शेतमजूरांना आज कोणते किमान वेतन मिळाले पाहिजे, याबद्दलची भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे.

ही भूमिका स्पष्ट करताना किमान वेतनाचे संदर्भात आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा थोडा विचार करावा लागेल. किमान वेतन या शब्दाची तशी व्याख्या कोठेही कायद्यात अद्याप झालेली नाही. परंतु ज्या वेतनाचे साह्याने मनुष्य आपल्या कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करू शकेल, त्याला किमान वेतन ढोबळ मानाने म्हणता येईल. परन्तु जीवनावश्यक गरजा म्हणजे कोणत्या ? याबद्दलही स्पष्टता होणे आवश्यक आहे. केवळ अन्न, वस्त्र, निवारा या तीन गरजा पूर्ण झाल्या म्हणजे जीवनावश्यक गरजा पूर्ण झाल्या असे म्हणता येईल काय ? माणसाला या तीन गरजांशिवाय शिक्षण–औषधपाणी या गरजांचीही आवश्यकता आहे. म्हणून या ‘ अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधपाणी ’ या पाच गरजा पूर्ण करण्याइतके वेतन हे किमान वेतन असे म्हणता येईल.

किमान वेतन ही कल्पना रूढ कशी झाली, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. पहिल्या महायुद्धानंतर १९२१ साली बंगाल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये प्रथम किमान वेतनाचा अभ्यास करण्यासाठी एका मंडळाची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर १९२८ आन्तरराष्ट्रीय श्रम संघटनेने किमान वेतनासंबंधी एक प्रस्ताव मंजूर केला. त्या अनुषंगाने १९२९ साली तत्कालीन भारत सरकारने कामगारविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या ‘ रॉयल कमिशनने ’ किमान वेतन निश्चित करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला व त्या दिशेने काही महत्त्वपूर्ण शिफारशीही केल्या. परंतु १९४३ सालापर्यंत त्या शिफारशी धूळ खात पडल्या होत्या. १९४३, १९४४, व १९४५ या तीन वर्षांत भारतीय श्रमपरिषदेत या विषयांची चर्चा होऊन किमान वेतन कायदा करण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. १९४६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तद्संबंधीचे विधेयक भारतीय संसदेत मांडले परंतु त्याच वेळी भारतात घटनात्मक बदल झाल्यामुळे ते बिल लगेचच पास होऊ शकले नाही. देश स्वतंत्र झाल्यानंतर १९४८ साली ‘ किमान वेतन कायदा ’ पास करण्यात आला.

या कायद्याप्रमाणे जे कामगार असंघटित व विखुरलेले आहेत व जे सामुदायिक सौदा करून स्वतःचे वेतन ठरवू शकत नाहीत अशा उद्योगांची एक सूची करण्यात आली. या सूचीनुसार ज्या व्यवसायात सर्व राज्यभर किमान एक हजार कामगार असतील, त्यांच्यासाठी राज्यशासनाने किमान वेतन ठरवून द्यावे अशी योजना आहे. राज्य-सरकार या सूचीमध्ये वाढ करू शकते. तसेच या व्यवसायास किमान वेतन लागू करावे असे राज्य सरकारला वाटत असेल तथील वेतनाचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकार एक समिती नियुक्त करते. या समितीवर मालक, कामगार व शासन या तिघांचेही प्रतिनिधी असतात. ही समिती संबंधित कामगारांना कोणते किमान वेतन असावे, यासंबंधी राज्य शासनाला शिफारशी करते व त्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य सरकार शासकीय आदेश जारी करून संबंधित व्यवसायाला किमान वेतन लागू करते. आजपर्यंत विडी, पिठाच्या गिरण्या, दगडाच्या खाणी, बांधकाम, शेती वगैरे अनेक व्यवसायांना किमान वेतन लागू केलेले आहे. इतर उद्योगांना किमान वेतन लागू करताना प्रत्येक कुटुंबात एकच मिळवता माणूस असेल व त्याला नवरा, बायको व मुले एवढ्या लोकांचा चरितार्थ चालवता आला पाहिजे असे जमेस धरून किमान वेतनाचा विचार झाला आहे.

पण शेती व्यवसायाबाबत हे तत्त्व गुंडाळून एका कुटुंबात दोन माणसे मिळवती असतील असे गृहीत धरले आहे. त्यामुळे शेतमजूरांचे किमान वेतन ठरवताना मोठाच अन्याय झाला आहे. महाराष्ट्रात या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९७३ साली नेमलेल्या ‘ पागे समितीने ’ याबद्दल आपला निर्णय देताना कुटुंबातील दोन माणसे मिळवती असतील असे गृहीत धरूनच शिफारशी केल्या आहेत. स्वतः ‘ पागे समितीने ’ या संदर्भात जी माहिती प्रसिद्ध केली आहे त्यात असे म्हटले आहे की, ‘ महाराष्ट्रातून शेतमजुरांच्या कुटुंबात मिळवत्या माणसांचे प्रमाण दर कुटुंबामागे १:५ असे आहे.

किमान वेतन ठरवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आता पुन्हा ‘ पागे कमिटी ’ नियुक्त केली आहे. या कमिटीने हा अन्याय दूर करावा असे आम्हाला वाटते. तरी याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा.

किमान वेतन ठरवताना किमान गरजा कोणत्या, यासंबंधीदेखील निरनिराळ्या शासकीय कमिट्यांनी सांगोपांग विचार केला आहे. दररोज दर व्यक्तीला २७०० कॅलरी उष्णता देऊ शकेल इतके अन्न पाहिजे. याचा अर्थ दर व्यक्तीला साधारणपणे ६१५ ग्रॅम धान्याची जरूरी असते. प्रत्येक व्यक्तीला वर्षातून १८ वार म्हणजे कुटुंबातील सर्वांना मिळून ७२ वार कापड मिळावे, हे तत्त्व सर्वमान्य झाले आहे. त्याचप्रमाणे किमान वेतनात केवळ उदरनिर्वाहासाठी म्हणजे अन्नासाठी लागणारा खर्च त्याच्या वेतनाच्या ४० % रकमेत पूर्ण झाला पाहिजे. राष्ट्रीय पाहणीच्या चौकशीनुसार शेतमजुराच्या कुटुंबात सरासरी साडेचार माणसे असतात असे आढळून आले आहे. म्हणजे त्याच्या कुटुंबाची रोजच्या अन्नाची गरज २७०० ग्रॅम असते म्हणजे जवळ

जवळ तीन किलोची आहे. आणि अन्नाच्या गरजेच्या अडीचपट वेतन मिळाल्याशिवाय त्याला माणसासारखे जगता येणार नाही. या अनुमानानुसार रोज कुटुंबात साडेसात किलो अन्न खरेदी करता येईल एवढे उत्पन्न वेतन कुटुंबातील मिळवत्या माणसांना मिळाले पाहिजे. शेतमजुरांच्या कुटुंबात मिळवत्या माणसांची संख्या सरासरीने १.५ आहे. तेव्हा कुटुंबातील मिळवत्या माणसांना सर्व कुटुंबाचा भार उचलावयाचा आहे असे गृहीत धरले तरी एका प्रौढाला कमीत कमी ५ किलो धान्य खरेदी करता येईल एवढे वेतन मिळाले पाहिजे

धान्याची किंमत ही सतत बदलती असल्याने शेतमजुरांना वेतनाचा काही भाग धान्याचे रूपात व काही भाग रोख पैशांचे स्वरूपात मिळणे आवश्यक आहे. आज सरासरीने २ रु. ५० पैसे दराने धान्याचा भाव बाजारात उपलब्ध आहे. सरासरी स्वस्त धान्याचे दुकानातदेखील ज्वारीचा भाव एक रु. पंच्याहत्तर पैसे असा आहे पण स्वस्त धान्याचे दुकानात पुरेसे धान्य उपलब्ध होत नाही ही गोष्ट जगजाहीर आहे. अशा परिस्थितीत २.५५ रुपये किलो हा धान्याचा भाव १९८१ साली गृहीत धरून शेतमजुरांचे किमान वेतन रु. १२.५० ठरवण्यात आले पाहिजे. यापैकी सात रुपये रोख आणि दोन किलो धान्याचे रूपात मिळावे अशी आमची मागणी आहे. मात्र धान्याचे भाव ज्या प्रमाणात वाढतील, त्या प्रमाणात रोखीने मिळणाऱ्या वेतनात वाढ झाली पाहिजे अशीही आमची मागणी आहे.

शेतमजुरांमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांप्रमाणेच मासिक व वार्षिक पद्धतीही काम करणारे नियुक्त करण्यात येतात. मासिक पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांना दरमहा किमान दोनशे रुपये रोख व दरमहा ६० किलो धान्य आणि वार्षिक पद्धतीवर काम करणाऱ्या सालदारांना किमान २५०० रुपये रोख व दरसाल ७ क्विंटल धान्य असे वेतन ठरवून देणे आवश्यक आहे. तसेच मासिक पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांना दरमहा ४ पगारी सुट्ट्या मिळाल्या पाहिजेत. वार्षिक पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना या ४ सुट्ट्यांखेरीज १५ पगारी सुट्ट्या मिळाव्यात अशी आमची मागणी आहे.

शेतमजुरांच्या कामाच्या तासाबद्दल उलटसुलट तक्रारी ऐकू येतात. सालदारीने काम करणाऱ्या कामगारांना दररोज १४-१४, १५-१५ तास काम करावे लागते अशी तक्रार आहे. याच्या उलट शेतमजूर ११ वाजता कामाला येतात, जेवणासाठी दुपारी दोन दोन तास सुटी घेऊन ५ किंवा ६ वाजता निघून जातात. म्हणजे ते रोज पाच तासही काम करीत नाहीत. अशी जमीनमालकांची तक्रार आहे. विशेषत: ग्रामीण जीवनात शास्त्रीय दृष्टिकोणाचा व शिस्तीचा अभाव असल्याने दोन्ही प्रकारच्या तक्रारींत काही प्रमाणात तथ्यांश आहे, असे दिसून येते. म्हणून कामाच्या तासांबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. रोज आठ तास (एक तास जेवणाची सुट्टी) काम करण्याची सवय ग्रामीण कामगारांना लावली पाहिजे यात शंका नाही, त्यासाठी ग्रामपंचायतीने घंटा वाजवण्यासारख्या काही उपायांची तरतूद करावी. त्याचप्रमाणे शेतमजुरांच्या संघटनांनीही किमान वेतनाच्या आग्रहास्तव आपल्या सभासदांना शिस्तीने काम करण्याची सवय लावली पाहिजे.

या कायद्याची अंमलबजावणी फारच ढिलाईने होते. जे व्यवसाय शहरात चालतात, तेथे मजूर खात्याचे अधिकारी जाऊन काही प्रमाणात तपासणी करू शकतात. परंतु शेतमजुरांचे किमान वेतन अंमलात आणणारी शासनाची यंत्रणा कुचकामी व लाचखाऊ आहे असे दिसून येते. एक तर तपासणी अधिकाऱ्यांना कायदा मोडणाऱ्या जमीनमालकाविरुद्ध कोणतेही अधिकार नाहीत, शिवाय बहुसंख्य तपासणी अधिकारी बड्या जमीनमालकांविरुद्ध जाण्यास तयार नसतात, म्हणून या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तालुका पातळीवर त्रिपक्षीय समित्या नेमून, त्यांचे निर्णय समितीने तक्रार आल्यापासून एक महिन्याचे आत द्यावेत. हे निर्णय सर्वांना कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहावेत. कायदे मोडणाऱ्या जमीनदारांना कठोर शासनाची तरतूद करावी. असे केले तरच किमान वेतनाची अंमलबजावणी थोडीफार होईल.

◎ ◎

## स्त्री-मुक्ती निबंध-स्पर्धा

(१) १५ वर्षांखालील मुलींकरता –
मी मुलगी आहे म्हणून –
मी मुलगा असते तर –
(२) १५ वर्षांवरील स्त्रियांकरता –
मी बाई आहे म्हणून –
मी पुरुष असते तर –

कमीत कमी ५०० शब्दांपर्यंत आपला निबंध असावा. उत्कृष्ट निबंधाला प्रत्येक गटात पुढीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

पहिले बक्षीस – रुपये ५००
दुसरे बक्षीस – रुपये ३००
तिसरे बक्षीस – रुपये २००

उत्तेजनार्थ – रुपये १०० ची पाच बक्षिसे देण्यात येतील.

आपले निबंध आमच्या संस्थेत दिनांक १५ ऑगस्ट १९८१ पर्यंत पोहोचले पाहिजेत. निबंधावर आपले नाव, वय, शिक्षण, विवाहित, अविवाहित, व्यवसाय ह्यांची थोडक्यात माहिती जोडण्यात यावी.

खालील पत्त्यावर संपर्क साधण्यात यावा :
संचालक, भारतीय अर्थ-विज्ञानवर्धिनी,
८२०१२ शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

◎ ◎

संग्राह्य, वाचनीय व मननीय
व्यक्तिचित्रे

**रविवारची चिंतनिका**

**ले. ह. रा. महाजनी**

**रु. १०–००**

प्राप्तिस्थान : **साधना प्रकाशन**
४३०–३१ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०